




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे अंक : ८०२ वा शुक्रवार दि. १४ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# राष्ट्रीय आरोग्य मिशनचे अधिकारी बनले मिस्टर इंडिया?

## अधिकारी सुटीवर अन् कार्यालयाचे मटांगा पलटी,घोडे फरार...

## माहिती देण्यास नेहमी काही न काही नवनवीन कारणे...

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र सरकारच्या अखत्यारित काम करणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य मिशनचे जिल्ह्यातील अधिकारी सध्या मिस्टर इंडिया झालेत की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे. कारण वारंवार या विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जात असतानाही त्या ठिकाणी कोणाशीही संपर्क होऊ शकलेला नाही. वरिष्ठ अधिकारीच अनुपस्थित असल्याने मग निर्ढावलेले कनिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणखीनच ढिसाळ बनल्याचे दिसून येत आहे. सध्यातरी या कार्यालयाची स्थिती **टांगा पलटी घोडे फरार** अशी झाली आहे. शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे, माता-बालमृत्यू दर कमी व्हावा, नवजात बाळांपासन मोठ्या मुलांपर्यंतचे आरोग्य चांगले रहावे, यासाठी राष्ट्रीय आरोग्य मिशनची सुरवात करण्यात आली आहे. सुरवातीला राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू करण्यात आले, त्यानंतर राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाची सुरवात करण्यात आली. २०१३ साली दोन्ही अभियानाचे एकत्रिकरण करून राष्ट्रीय आरोग्य मिशनची सुरवात करण्यात आली. मात्र, सध्या जिल्ह्यात या मिशनला चांगलीच घरघर लागल्याचे दिसून येत आहे.मागील काळात तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोनटक्के,डॉ.पंडित,डॉ तडस व प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक सह बहुचर्चित भांडारपाल यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात तर भ्रष्टाचार आणि अनागोंदीचे

### पोस्टमार्टम १०३

शिखर गाठलेले आहेच, परंतु त्याच परिसरात कार्यरत राष्ट्रीय आरोग्य मिशनला देखील अनागोंदीची लागण झाल्याचे दिसून येत आहे. कारण जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक दिवसांपासून इमारतीचे नियमबाह्य बांधकाम करण्यात येत आहे. या इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट तसेच बेकायदेशीररित्या होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. कारण ज्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या परिसरात हे काम करण्यात येत आहे, त्याच रुग्णालयाच्या प्रशासनाला त्यातली भरपूर अशी माहितीच देण्यात नाही आल्याची चर्चा कार्यालयात दिसून येत आहे बऱ्याच कामाविषयी कसलीही माहिती नाही. यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने गेल्या अनेक दिवसांपासून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. सुरवातीला रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती विचारली असता, त्यांनी आपल्याकडे यासंदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट आहे की, राष्ट्रीय हेल्थ मिशन विभागाचे अधिकारी आणि हे काम करणारा तीन चार जिल्ह्या पलीकडील कंत्राटदार याने रुग्णालयाच्या

**संबंधित अधिकारी किती ही माहिती देण्यास लपवा छपवी करीत असेल तर आम्ही याचा पूर्ण छडा लावून सत्यता बाहेर आणूच**

वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात विश्वासातच घेतले नाही. त्यांना कसलीही माहिती दिली नाही. हे काम राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या अंतर्गत होत असल्याने मग या कामाची माहिती राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या अधिकाऱ्यांना विचारण्यात आली. परंतु राष्ट्रीय आरोग्य मिशनचे प्रमुख अधिकारी जावरकर हे अनेक दिवसांपासून आपल्या कार्यालयात भेटत नाहीएत. जावरकर हे गेल्या काही दिवसांपासून सुटीवर असल्याचे सांगितले जात आहे. त्यांचे मोबाईल स्विच ऑफ दाखवत आहे वरिष्ठ अधिकारीच हजर नसल्याने मग या विभागातील बाकी अधिकारी व कर्मचारी चांगलेच निर्ढावल्याचे दिसून येत आहे. कारण जिल्हा रुग्णालयात बांधण्यात येत असलेल्या या कोट्यवधी रुपये खर्च करून इमारतीच्या बांधकामाची माहिती कोणीही देण्यास तयार नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयाप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग देखील अत्यंत भ्रष्ट व निर्ढावलेला झाल्याने त्या ठिकाणाहूनही माहिती मिळत नसल्याचे दिसून येत आहे. एखाद्या प्रोजेक्टविषयी माहिती देण्यास एव्हढी टाळाटाळ तेंव्हाच केली जाते, तेंव्हा त्या ठिकाणी भ्रष्टाचाराची दुर्गंधी आल्याशिवाय राहत नाही. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजया संपूर्ण




बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड वारंवार करीत आहे. परंतु तरीही भ्रष्टाचाराने नखशिखांत माखलेली ही यंत्रणा जागची हलायला देखील तयार नाही. यासंदर्भात माहिती कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी किरण पाटील आणि बाकी सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवाहन करीत आहोत की, या भ्रष्टाचारासंदर्भात तात्काळ माहिती घेऊन योग्य ती कारवाई करावी, या इमारतीचे बांधकाम उत्कृष्ट दर्जाचे करावे आणि माहितीची लपवाछपवी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. भ्रष्टाचार मग तो कुठेही असो, त्यावर आसूड ओढण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने करीत राहणार आहे. त्यासाठी मग कितीही मोठा संघर्ष करावा लागला, तर आमची संपूर्ण तयारी आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

## कर्जाला कंटाळून शेतकऱ्याने विष प्रशान करून केली आत्महत्या

**जनसंचलन/जळगाव.जा.**

भालेगाव बाजर येथील शेतकरी राजाराम वामन घोडके (वय ५०) या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना ११ जून रोजी घडली. राजाराम वामन घोडके यांनी भारतीय स्टेट बँकेचे ७० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. सततच्या नापिकीमुळे कर्ज फेडणे शक्य न झाल्याने व पुढील पेरणीचे संकट असल्याने त्यांनी विष प्राशन करून जीवनयात्रा संपविली.



राजेश घोडके यांचा मनमिळाऊ स्वभाव होता. भालेगाव बाजार येथे त्यांच्या मृत्यूची बातमी कळताच गावात शोककळा पसरली होती.

## सोन्या चांदीच्या वस्तुंसह नगदी दोन लाख केले लंपास

**जनसंचलन/दुसरबीड**

सिंदखेडराजा तालुक्यातील पिंपळगाव लेंडी येथील शेतकरी महीलेच्या घरी रविवार च्या मध्यरात्री अध्यात चार चोरट्यांनी काठीचा धाक दाखवून सौ शालुबाई नारायण गायके वय ५५ वर्षे हात धरून तोंड दाबून जबरदस्तीने अंगावरील वस्ता व कपाटातील रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाल्याची घटना दि १० जून रोजी घडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की रविवार ००/१५ ते ००/४० वाजेदरम्यान पिंपळगाव लेंडी येथील फिर्यादी च्या घरीअनोळखी चार चोरट्यांनी फिर्यादीला काठीचा धाक दाखवुन हात धरुन तोंड दाबुन जबरदस्तीने फिच्या अंगावरील कानातील बाळया ०५ ग्रॅम किं १५,००० रु सोन्याचा सेवनपिस वजन १ तोळा अंदाजे ५०००० रु मणीमंगळ सुत्र १ तोळा किं. अं. ३०००० रु व दोन्ही हातातील चांदीच्या कड्या व पाटल्या १०००० रु व घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले एकुण २,१४,००० रु व फिच्या मोठ्या मुलाच्या घरातील जुन्या सोन्याची गहुमण्याची पोत अंदाजे १ तोळा अं. ३०००० रु, एकदानी पोत १ तोळा अंदाजे किं ३००००रु झुंबर वेल फुल वजन अं ६ ग्रॅम ३००००



रु. असा एकुण ४,०९,००० रु चा मुददेमाल अज्ञात चोरटयांनी चोरून नेला आहे. अशा फिर्यादी च्या तोंडी रिपोर्टवरुन अप नं १२९/२०२४कलम ३९४, ४५७, ३८०, भादंवि नुसार गुन्हा दाखल करुन पुढील तपास ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनात पोउपनि युवराज राठोड हे करीत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खरीप हंगामासाठी जिल्हा प्रशासनाचे विशेष आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

येता खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना योग्य भावात बियाणे, रासायनिक खते मिळणे, बिज उगवण आणि बिजप्रक्रिया, पेरणीपूर्व मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच बियाणे खरेदी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी कृषि विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यात मान्सूनमध्ये १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. परंतू हा पाऊस नियमित, विनाखंड स्वरूपात पडणे आवश्यक आहे. आतापर्यंत ५१ मिलीमीटर पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी १०० मिलीमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. जमिनीमध्ये चार इंच खोल ओलावा निर्माण झाल्यानंतर पेरणी करावी, अल्प पावसावर पेरणी करू नये. असे केल्यास पावसाचा खंड पडल्यास दुबार पेरणीची वेळ शेतकऱ्यांवर येऊन आर्थिक शकते. शेतकऱ्यांनी त्यांच्या मागणीनुसार बियाणे आणि खते खरेदी करावी. बियाणांच्या बाबतीत कोणत्याही अफवांना बळी पडू नये. विकत घेतलेले बियाणे जतन करून ठेवावे. बोगस बियाणे आणि किटकनाशके विक्री केल्यास परवाना रद्द करण्यात येत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी तक्रारी कराव्यात. बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी त्याचे देयक घ्यावे. देयक आणि बियाणांचे नमुने साठवून ठेवावेत. बियाणे बोगस निघाल्यास याबाबत रितसर तक्रार करावी. शेतकऱ्यांनी एका पिकावर अवलंबून राहण्यापेक्षा विविध पिके, आंतरपिक घेण्याकडे घ्यावीत. तसेच प्रतिकुल हवामानातही टिकणारे आणि विविध रोगांना प्रतिकार करू शकतील सअसे आधुनिक, नवीन आणि जादा उत्पादन देणाऱ्या वाणांची निवड करावी. पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी बीज प्रक्रिया करावी. सोयाबीन, कापूस आणि मका पिकांना संरक्षण मिळावे, यासाठी शेततळ्याचा लाभ घ्यावा. यासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावा. शेततळ्यांमध्ये पाण्याची उपलब्धता असल्यास रब्बीमध्येही पिक घेणे शक्य होईल. तलावाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी गाळ काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. तलावात जुलैच्या मध्यापर्यंत पाणी साठणार असल्याने गाळ काढण्याची संधी आहे. हा गाळ काढून शेतामध्ये टाकण्यासाठी कोणत्याही परवानगीची गरज नाही. शेतकरी हा गाळ शेतामध्ये टाकून जमिनीची सुपिकता वाढवू शकतील. यासाठी शेतकऱ्यांसह ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा. मात्र यात मुरूम आणि इतर गौण खनिजांची अवैध उत्खनन होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे. जिल्हा प्रशासनातर्फे खरीप हंगाम यशस्वी होण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी बियाणे आणि रासायनिक खते खरेदी करताना सतर्कता बाळगावी. पेरणी आणि पेरणी पश्चात घ्यावयाच्या काळजीबाबत कृषि विभागाने दिलेल्या सल्ल्यानुसार शेतकऱ्यांनी खरीप हंगामात कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शासकीय अध्यापक महाविद्यालयात कंत्राटी पदभरती

जनसंचलन/बुलढाणा

महाविद्यालयाकरीता आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या कालावधीकरीता एक सफाई कामगार आणि एक रात्रपाळी पहारेकरी अशी २ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आहे. यासाठी आवेदनपत्र मागविण्यात आले आहे. पद भरतीसाठी विहित आवेदनपत्र शासनमान्य कंत्राटदार, पंजीकृत बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्था, लोकसेवा केंद्राकडून द्वि-लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. महाविद्यालयाकडे प्रति शेड्युल ५०० रूपयांचा भरणा करून दि. १९ ते २१ जून २०२४ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मिळू शकतील. दि. २५ जून २०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहोरबंद निविदा स्विकारण्यात येतील. तसेच मोहोरबंद निविदा दि. २७ जून २०२४ रोजी दुपारी १२ वाजता प्राचार्यांचे दालनात उघडण्यात येतील. त्यावेळेस संबंधित निविदाधारकांनी प्राचार्यांच्या दालनात दुपारी १२ वाजता उपस्थित राहावे, यासंबंधी अंतिम निर्णय प्राचार्यांचे राहणार आहे. सदर निविदा महाविद्यालयाचे संकेतस्थळ gcebedbuldan.org.in वर उपलब्ध आहे, असे शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. एस. एस. लिगायत यांनी कळविले आहे.

# शेतकऱ्यांनी बांबू शेतीसाठी पुढाकार घ्यावा- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## २० हजार हेक्टरवर बांबू शेतीचे उद्दिष्ट...

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांना पारंपरिक पिकांपासून दूर करून त्यांना बांबू शेतीकडे वळविण्यासाठी राज्य शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहे. बांबू शेतीसाठी शेतकऱ्यांना ७ लाख ४० हजार रूपये प्रती हेक्टर तीन वर्षांसाठी अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बांबू शेतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्यात बांबू शेतीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, विभागीय वन अधिकारी विपूल राठोड, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक सुनील पाटील, इश्वेद बायोटेकचे संजय वायाळ आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, पारंपरिक पिकापासून दूर करून शेतकऱ्यांना तीन वर्षात बांबू शेतीपासून शाश्वत उत्पन्न मिळणार आहे. शेतकऱ्यांनी बांबू शेतीसाठी पुढाकार घेतल्यास त्यांना शासनातर्फे संपूर्ण सहकार्य करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी पंचायत समिती, कृषि विभागाकडे अर्ज केल्यानंतर त्यांना बांबूची रोपे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बाल्को ही जादा पाणी आणि ग्रीन वुल्गरीस बांबू ही कमी पाण्यावर जागणारी प्रजाती आहे. मग्रारोहयो अंतर्गत बांबूची लागवड होणार आहे. सामाजिक वनीकरणकडून शेतकऱ्यांच्या बांधावर बांबू लागवड करण्यात येणार आहे. यावर्षी सुमारे २५ हजार रोपे लागवड करण्यात येणार आहे. शेतीचे विविध प्रयोग करताना बांबू हा चांगला पर्याय शेतकऱ्यांकडे आहे. शेतकऱ्यांना बांबूची रोपे रोहयोमधून मोफत देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक गावात शेतकऱ्यांचा गट करून त्यांच्यामार्फत बांबू शेतीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. गावपातळीवर शेतकऱ्यांची निवड करून त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. बांबू शेती करताना पहिल्या वर्षी शेतकऱ्यांना आंतरपिक घेता येणार आहे. बांबू शेतीसाठी चार वर्षात टप्पाटप्प्याने ७ लाख ४० हजार रूपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. बांबूच्या रोपांची नर्सरी मध्ये उपलब्धता आहे. ज्यामुळे रिकाम्या जागी, सोयीच्या ठिकाणी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांच्याकडून बांबू लागवड करण्यात येणार आहे. रोपांसाठी कृषी सहायक आणि मंडळ अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा लागणार आहे. शेततळ्या सभोवताल बांबूची लागवड शक्य आहे. तसेच कुंपन म्हणूनही बांबूची लागवड करता येणे शक्य आहे. तसेच यातून मिळणारा लाभ पूरक उत्पन्न म्हणून शेतकऱ्यांना मिळणार आहे. बांबूचा समोवश गवतात केला आहे. बांबू तोडण्यास कोणत्याही परवानगीची गरज नाही. त्यामुळे बांबू शेतीसाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे, यासाठी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावे. मनरेगा अंतर्गत मोफत बांबू रोपे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीमार्फत गटविकास अधिकारी यांच्याकडे मागणी नोंदवावी. याबाबत अडचण असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# मेरा बुद्रुक येथे स्पिंकलरच्या तोट्या चोरट्याने केल्या लंपास...



जनसंचलन/मेरा बु

तालुक्यातील मौजे मेरा बुद्रुक येथे १२ जून च्या रात्री जवळपास ९० ते १०० स्पिंकलरच्या तोट्या अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत याची माहिती अंढेरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विकास पाटील यांना मिळताच त्यांनी मेरा बुद्रुक येथे येऊन सदर शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाऊन घटनेची माहिती घेतली आणि आपल्या यंत्रणेच्या माध्यमातून सदर चोरीचा तपास करण्यास सुरुवात केली असता चिखली येथील पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मेहकर फाटा येथे काही अज्ञात व्यक्तीकडून स्पिंकलरच्या छोट्या मिळून असल्याचे माहिती अंढेरा पोलीस स्टेशनचे निरीक्षक विकास पाटील यांनी सदर कास्तकराला दिली आहे मेरा बुद्रुक अंत्री खेडेकर या भागामध्ये पाईपच स्पिंकलरच्या तोट्या जाण्याचे प्रमाण खूपच जास्त झाले आहे शेतकरी आज हवालदिल झाला आहे आज शेतकरी हा पेरणीसाठी बियाणे व खाता आणण्यासाठी पैशाच्या बेतात असतानाच ऐन पेरणी पाण्याच्या वेळेसच शेतातील तोट्या चोरी होणे ही खूप मोठी चिंतेची गोष्ट शेतकऱ्यासाठी झालेली आहे यापूर्वी सुद्धा मेरा बुद्रुक व अंत्रीखेडेकर याशिवारातून स्पिंकलरच्या तोट्या चोरी गेलेले आहेत त्याचा तपास अजून पर्यंत लागलेला नाही तोच आता नविन शंभर तोटे आज्ञात चोरट्यांनी मेरा बुद्रुक शिवारातून चोरून नेले आहेत तसेच मेरा बुद्रुक येथील शेतकरी पुंडलिक पडघान १५ शिवाजी पडघान १७ निखिल पडघान ३० ज्ञानेश्वर पडघान ८श्रीकृष्ण पडघान १२ रामदास गावडे ८ अशा शेतकऱ्यांच्या शेतामधून स्पिंकलरच्या तोट्या चोर गेलेले आहेत तसेच निखिल पडघान यांच्या शेतामधून दोन दिवसा अगोदरच कोंबड्याचे सुद्धा चोरी झालेली आहे हे जर चोरीचे प्रमाण असे चालू राहिले तर शेतकऱ्याला शेती करणे सुद्धा कठीण होईल अशी चर्चा शेतकरी वर्गातून होत आहे तरी माननीय पोलीस निरीक्षक अंढेरा विकास पाटील यांनी या बाबीकडे लक्ष देवून स्पिंकलरच्या तोटे चोरणाऱ्या चोराचा बंदोबस्त करावा अशीच चोरी झालेल्या कास्तकारांची मागणी आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# एक कोटी वृक्षलागवडीत सर्व घटकांचा सहभाग घेणार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या निर्णयानुसार एक जुलैपासून एक कोटी वृक्षलागवडीस सुरवात होणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यासाठी सर्व घटकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्षलागवडी संदर्भात आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय इंगळे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, वृक्ष लागवड मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. यासाठी शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायती, कर्मचारी, बचतगटांच्या महिलांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यात यावे. या वृक्ष लागवडीसाठी रोपे मोफत देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर फळपिक घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येऊन वृक्ष लागवड करावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. वृक्ष लागवडीमधील रोपे वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच ही झाडे दत्तक घेण्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. वृक्ष लागवड मोहिमेसोबतच बांबूची लागवड करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. बांबूची रोपे इश्छेद बायोटेक या कंपनीकडून देण्यात येणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने रोपांची मागणी नोंदवावी. बांबू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन वर्षात हेक्टरी ७ लाख ४० हजार रूपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे बांबू शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे. मनरेगा अंतर्गत बांबू लागवड करण्यात येणार आहे. यासाठी शासनाचे स्वतंत्र निर्देश येणार आहे. त्यानुसार राज्य शासनाची ही प्रमुख योजना म्हणून राबविल्या जाणार आहे. बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



यातून बांबू लागवड आणि विपनन संदर्भात माहिती देण्यात येणार आहे. वृक्षांची रोपे सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागाच्या नर्सरीमधून देण्यात येणार आहे. वृक्ष लागवड मोहिमेसाठी जागा निश्चिती करण्यात यावी. यासाठी मोकळ्या जागा, अतिक्रमीत जागांचा शोध घेऊन याठिकाणी वृक्ष लागवड करण्यात यावी. शाळांमधील मोकळ्या जागा, कुंपन, ग्रामपंचायतीचे क्षेत्र, तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याकडून एक झाड लागवड करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील २८ हजार बचतगटांच्या महिलांनाही यात सहभागी करून त्यांच्याकडून वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. वृक्षाचे संगोपन करण्यासाठी ही झाडे दत्तक देण्यात येणार आहे.

# मका, ज्वारीच्या नोंदणीस २० जूनपर्यंत मुदतवाढ





**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाकडून भरडधान्य खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोंदणी साठी दि. २० जून २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांची हमी दराने भरडधान्य ज्वारी नोंदणीसाठी दि. ३१ मे २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली. मागील हंगामामधील शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी आणि रब्बी हंगाम २०२३-२४ मधील शेतकरी नोंदणी पाहता रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये भरडधान्य खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोंदणी पुरेशी झाली नाही. त्यामुळे ही मुदत वाढ देण्यात आली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी, आधारकार्ड, रब्बी २०२३-२४ चा ऑनलाईन पिकपेरासह सातबारा, आधार लिंक बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स, मोबाईल नंबर घेऊन कागदपत्रे स्कॅन करुन शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. तसेच हाताने लिहिलेले सातबरा व खाडाखोड केलेले कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत. शासनाने दिलेल्या कालावधीमध्ये शेतकरी नोंदणी होणार असल्यामुळे नोंदणीसाठी आलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज त्याच दिवशी पोर्टलवर नोंदणी करुन घेण्यात येणार आहे. ऑफलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच ऑनलाईन सातबारावरील ज्वारी पिक पेऱ्यापेक्षा जास्त क्षेत्रावर नोंदणी करण्यात येणार नाही, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी कळविले आहे.

# आरोग्य सेवक भरती प्रक्रियेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

MSDhulap
MSDhulap

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवक पदासाठी परिक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध करण्यात आले आहे. ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील गट-क मधील विविध संवर्गातील राबविण्यात येत आहे. या भरती प्रक्रियेसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३ करीता आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी) संवर्गाची परीक्षा दि. १३ ते १५ जून २०२४ या कालावधीत होणार आहे. या संवर्गातील परिक्षेकरीता जिल्हा परिषद, बुलडाणाच्या zpbuldhana.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशपत्रासाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार यांनी केले आहे.

# कृषी दिनानिमित्त शहरात ग्रीन बुलडाणा मिशन...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा प्रशासन, बुलडाणा नगर पालिका आणि इंडियन रेड क्रॉस समितीतर्फे कृषी दिनानिमित्त दि. १ जुलै २०२४ रोजी शहरामधील प्रमुख रस्ते, पादचारी रस्ते, लेआऊट मधील खुल्या जागेवर वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी ग्रीन बुलडाणा मिशन राबविण्यात येणार आहे. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेल्या बुलडाणा शहराला पुर्वीचे गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी, तसेच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी या पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यात शहरातील शैक्षणिक, सामाजिक संस्था, अशासकीय संस्था सामुदायिक मंडळ, विविध




संघटनाचे पदाधिकारी आणि नागरीकांनी राष्ट्रीय उपक्रमामध्ये सहभाग होणे आवश्यक आहे. सामुहिक वृक्ष लागवडीसाठी बुलडाणा नगरपालिका खड्डे खोदण्यासाठी मदत करणार आहे. त्यानुसार वृक्ष लागवडीसाठी संबंधितांनी परिसरातील सुयोग्य जागेची निवड करावी, तसेच याबाबत मुख्याधिकारी यांना जागाची व वृक्ष लागवडीकरीता आवश्यक रोपाची माहिती देण्यात यावी. वृक्ष लागवडीसाठी जागा उपलब्ध नसल्यास नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर वृक्ष लागवडीसाठी नागरिकांनी सहभाग नोंदवावा. तसेच सामुहिकपणे लावण्यात येणारी रोपे नागरिकांनी दत्तक घेऊन संगोपन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनने केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# काँग्रेसचे २८८ जागांवर संघटना मजबूत करण्याचे काम सुरू, जागावाटप मेरिटनुसार व्हावे: नाना पटोले

वृत्तसंस्था/ नागपूर

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले असले तरी यापेक्षाही अधिक यश मिळू शकले असते. आता विधानसभा निवडणुकीत आघाडी म्हणून लढताना मेरीटनुसारच जागा वाटप झाले तर चांगला निकाल लागू शकतो. काँग्रेस पक्ष महाविकास आघाडी म्हणूनच विधानसभा निवडणूक लढवणार असून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघातील संघटनात्मक बांधणीवर भर देणार असून राज्यातील भाजपाचे भ्रष्ट सरकार सत्तेबाहेर काढणे हाच उद्देश आहे, असे काँग्रेसटे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, लोकसभा निवडणुकीवेळी काँग्रेसने राज्यातील सर्व ४८ जागांवर संघटनात्मक बांधणी केली होती, त्याचा फायदा काँग्रेस पक्षाबरोबरच महाविकास आघाडीला झाला. आताही विधान सभेसाठी २८८ जागांवर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. एकत्रित लढायचे असेल तरी संघटनात्मक तयारी करायला लागते. काँग्रेसने सर्व जागांवर तयारी केली तर त्याचा फायदा मित्रपक्षांनाही होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावेळी मेरिटचा विचार केला असता तर आणखी चांगले परिणाम दिसले असते.राज्यातील भाजपा सरकारला सत्तेतून बाहेर काढणे हेच महत्वाचे आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या नावाने योजना करुन कोट्यवधी रुपये लुटले आहेत. डीबीटी योजनेतून टेंडर न काढता मुख्यमंत्र्यांनी खरेदी करुन लुट केली. सरकारकडे शेतकऱ्यांना देण्यासाठी पैसे नाहीत पण त्यांच्या नावावर लुट मात्र सुरु आहे. बांधकाम विभागाच्या जागा तारण ठेवून त्यावर कर्ज काढले आहे. राज्याच्या जनतेला कर्जात डुबविण्याचे काम सुरु आहे, या सर्व मुद्द्यांवर अधिवेशनात सरकारला जाब विचारु असेही नाना पटोले म्हणाले.पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, छगन भुजबळांना त्रास होत आहे हे स्पष्ट दिसत आहे, भाजपा हा ओबीसीची नेतृत्वाची नेहमीच अवहेलना करते आला आहे. ओबीसी नेता भाजपाच्या सानिध्यात असेल तर त्याला टार्गेट केले जाणारच. गोपीनाथ मुंडे यांच्याबाबत काय घडले हे सर्वांनी पाहिले आहे. याच छगन भुजबळांना जेलमध्ये टाकले होते, त्यावेळी ते डाकू होते आता ते संन्यासी झाले आहेत. भाजपाला ओबीसींची मते हवी आहेत, नेते मात्र नको आहेत.नीट परीक्षेत केवळ ग्रेस मार्क्सचा मुद्दा नव्हता तर या परीक्षेत घोटाळा झालेला आहे, पेपर लिक झाला आहे हे गंभीर आहे. नीट परीक्षेला बसलेल्या देशभरातील २४ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याचा




हा प्रश्न आहे. परीक्षा केंद्र व कोचिंग क्लासेसवाल्यांची अभद्र युती झालेली आहे आणि त्यातून हा घोटाळा झालेला आहे. केंद्रातील भाजपा सरकार च्या खांद्यावर बंदुक ठेवून आपली जबाबदारी झटकू पहात आहे. या घोटाळ्याची सीबीआय चौकशी झाली पाहिजे ही काँग्रेस पक्षाची मागणी आहे, असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.

## मंगळवारी महिला लोकशाही दिन

जनसंचलन/बुलढाणा

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवारी शासकीय सुट्टी असल्याने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन मंगळवार, दि. १८ जून २०२४ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी




आयोजित करण्यात येतो. त्यानुसार जून २०२४ मधील तिसऱ्या सोमवारी सुट्टी असल्याने हा महिला लोकशाही दिन मंगळवारी घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

## जांभूळ खाण्यासाठी झाडावर चढणे जीवावर बेतलं...

### फांदी तुटल्याने झाडावरून पडला कोलवड येथील शुभमचा जागीच मृत्यू

जनसंचलन/ बुलढाणा

कोलवड शिवारातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. जांभूळ तोडण्यासाठी झाडावर चढलेल्या १४ वर्षीय मुलाचा जमिनीवर कोसळून मृत्यू झाल्याची घटना काल १२ जूनला सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली.

शुभम गजानन गवई असे मृतक बालकाचे नाव आहे. कोलवड गावाला लागून असलेल्या एका शेतातील जांभळाच्या झाडावर चढून तो जांभूळ तोडण्याचा प्रयत्न करत होता. दरम्यान, झाडाची फांदी तूटल्यामुळे शुभम खाली कोसळला. यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. शुभमला परिसरातील लोकांनी तात्काळ बुलडाणा येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी शुभमला मृत घोषित केले. याप्रकरणी बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण कोलवड



परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## शेतातील तारा, ऐन पेरणीच्या दिवसात लोमकळत पडल्यात मात्र अजूनही दुरुस्तीच नाव नाही!

जनसंचलन/ खामगाव

गेल्या पंधरा दिवसा आधी झालेल्या वादळामुळे पातोंडा शिवारातील शेतात जाणाऱ्या मुख्य लाईनच्या तारा लोमकळत पडल्या आहेत, मात्र अजूनही प्रशासन त्या लोमकळत पडलेल्या तारा दुरुस्त करण्याचं नाव घेत नसल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मागील १५ दिवसांआधी खामगाव तालुक्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याचाच फटका महावितरणला सुद्धा बसला होता. अनेक ठिकाणी मोठ - मोठे झाडे पडल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला होता. पातोंडा शिवारात सुद्धा झाडे पडल्याने बऱ्याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित होऊन,विद्युत तारा जमिनीवर लोमकळत आहेत. पातोंडा शिवारातील महादेव भुसारी, सुनील सुलताने यांच्या शेतात जाणाऱ्या मुख्य लाईनच्या तारा गेल्या पंधरा दिवसांपासून जमिनीवर लोमकळत आहेत मात्र अजूनही प्रशासन त्या दुरुस्त करण्याचं नाव घेत नसल्याचा प्रकार उघडकीस येत आहे. शेतकऱ्यांना शेती पेरावी लागते मात्र अशा लोमकळलेल्या तारांचा चुकून झटका शेतात



काम करणाऱ्या शेतकऱ्यांना, मजुरांना किंवा जनावरांना लागल्यास इथं अपरिचित घटना घडू शकते. त्यामुळे या लोमकळत असलेल्या तारा लवकरात - लवकर संबंधित महावितरण वाल्यांनी दुरुस्त करून भविष्यात होणाऱ्या घटनेला आळा घालावा.

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले श्रींच्या समाधींचे दर्शन



जनसंचलन/शेगाव

आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गुरुवारी, दि. १३ जून रोजी शेगाव येथे श्री संत गजानन महाराजांच्या समाधी आणि श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले. श्रींचे दर्शन घेतल्यानंतर संस्थानच्या वतीने श्री. जाधव यांचा स्वागत शाल आणि श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार संजय रायमुलकर, संस्थानचे विश्वस्त हरीहर दादासाहेब पाटील, तसेच सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.